नियमीत दिवाणी दावा नं. १८४/२०११

**नि. २८ खाली आदेश**

**दि. ०३/०७/२०१४**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरिता दाखल केला आहे. वादीने सदरचा दावा, प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीमधील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी नं. १ने हरकत अडथळा करु नये, तसेच दावा मिळकत अन्य त्रयस्थ इसमास विक्री करु नये म्हणून कायम मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ याने दावा मिळकत श्री. जयप्रकाश बापूसो पाटील व सौ. ज्योती जयप्रकाश पाटील यांना दिनांक ३०/०१/२०१२ रोजीच्या रजि. दस्त नं. १३३१ने विक्री केल्याचे नुकतेच वादीला समजून आले आहे. त्यामुळे दावा कलम १२ नंतर १२(अ), कलम १४ मध्ये दुरुस्ती व कलम १९(अ) नंतर १९(अ)(१) करुन दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल होत नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे याच अर्जावर दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलणार आहे. वादीने दाव्यास नवीन कारण निर्माण केले आहे. दाव्यास नवीन कारण निर्माण झाल्यास, नवीन दावा दाखल करावा लागतो. परंतु, वादीने दाव्याचे कारण बदललेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये वादी किंवा प्रतिवादींना आपल्या कथनांमध्ये दुरुस्ती करता येते. सदरची दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांचे मधील वादप्रश्न कायमस्वरुपी संपुष्टात येण्याकरिता आवश्यक असावी. वादीने सदरचा दावा कायम मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ याने दावा मिळकत श्री. जयप्रकाश बापूसो पाटील व सौ. ज्योती जयप्रकाश पाटील यांना दिनांक ३०/०१/२०१२ रोजीच्या रजि. दस्त नं. १३३१ने विक्री केल्याचे वादीचे कथन आहे. वादीने प्रस्तुतचा दावा दिनांक ०४/११/२०११ रोजी

दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ने दिनांक ३०/०१/२०१२ रोजी म्हणजे प्रस्तुतचा दावा दाखल झाल्यानंतर दावा मिळकत श्री. जयप्रकाश बापूसो पाटील व सौ. ज्योती जयप्रकाश पाटील यांना विक्री केल्याचे वादीचे कथन आहे. सदरची घटना दावा दाखल झाल्यानंतर घडल्यामुळे वादीला प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. वादीने, प्रतिवादी नं. १ने दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री करु नये अशी त्याच्या विरुध्द कायम मनाई मिळणेसाठी सदरचा दावा दाखल केला आहे. असे असतानाही प्रतिवादी नं. १ने दावा मिळकत त्रयस्थ इसमास विक्री केल्याचे वादीचे कथन आहे. त्यामुळे दाव्यास नवीन कारण घडलेले आहे म्हणून वादीने स्वतंत्र दावा दाखल करणे गरजेचे आहे, हे प्रतिवादीचे कथन संयुक्तिक नाही. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. त्यामुळे वादीला तशी दुरुस्ती करण्यास परवानगी देता येईल असे माझे मत आहे.

## आदेश

१. वादीचा नि. २८ वरील अर्ज मंजूर  करण्यात येत आहे.

२. वादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादीने सदरची दुरुस्ती दि.०९/०७/२०१४ पर्यंत करावी.

सही/-

**(मा. ये. वाघ)**

दिनांकः ०३/०७/२०१४

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पेठ वडगांव

नियमीत दिवाणी दावा नं. १८४/२०११

**नि. २७ खाली आदेश**

**दि. ०३/०७/२०१४**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये दाव्यामध्ये जयप्रकाश पाटील व ज्योती पाटील यांना पक्षकार करण्याकरिता दाखल केला आहे. वादीने सदरचा दावा, प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीमधील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी नं. १ने हरकत अडथळा करु नये, तसेच दावा मिळकत अन्य त्रयस्थ इसमास विक्री करु नये म्हणून कायम मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ याने दावा मिळकत श्री. जयप्रकाश बापूसो पाटील व सौ. ज्योती जयप्रकाश पाटील यांना दिनांक ३०/०१/२०१२ रोजीच्या रजि. दस्त नं. १३३१ने विक्री केल्याचे नुकतेच वादीला समजून आले आहे. त्यामुळे त्यांना पक्षकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास आपले म्हणणे याच अर्जावर दाखल करुन वादीने दाव्यास नवीन कारण निर्माण केले आहे. दाव्यास नवीन कारण निर्माण झाल्यास, नवीन दावा दाखल करणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(२) नुसार दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केला असल्यास किंवा अर्ज केला नसला तरीही न्यायालयास योग्य व आवश्यक वाटेल अशा व्यक्तीला वादी किंवा प्रतिवादी म्हणून दाव्यामध्ये समाविष्ट करण्याबाबत किंवा दाव्यातून कमी करण्याबाबत आदेश करता येतो. वादीने सदरचा दावा कायम मनाई मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं. १ याने दावा मिळकत श्री. जयप्रकाश बापूसो पाटील व सौ. ज्योती जयप्रकाश पाटील यांना दिनांक ३०/०१/२०१२ रोजीच्या रजि. दस्त नं. १३३१ने विक्री केल्याचे वादीचे कथन आहे. वादीने प्रस्तुतचा दावा दिनांक ०४/११/२०११ रोजी दाखल केलेला आहे. सदरची घटना दावा दाखल झाल्यानंतर घडल्यामुळे वादीला प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. जयप्रकाश पाटील व ज्योती पाटील यांनी दावा मिळकत खरेदी केल्याने दावा

मिळकतीमध्ये त्यांचा हितसंबंध निर्माण झाला आहे. त्यामुळे ते दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार आहेत असे माझे मत आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वादीचा नि. २७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. जयप्रकाश बापूसाहेब पाटील व ज्योती जयप्रकाश पाटील यांना प्रतिवादी नं. ३ व ४ म्हणून समाविष्ट करण्यात यावे.

३. वादीने आवश्यक ती दुरुस्ती दि.०९/०७/२०१४ पर्यंत करावी.

सही/-

**(मा. ये. वाघ)**

दिनांकः ०३/०७/२०१४ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पेठ वडगांव